महाराष्ट्र शासन

# महसुल व वनविभाग

## उपवनसंरक्षक, सोलापूर वनविभाग, सोलापूर यांचे कार्यालय

"वनभवन" विजापूर रोड,सोलापूर, 413 004.

दूरध्वनी क्र. 0217/2345096 ई-मेल forestofficesolapur@gmail.com फॅक्स नं.0217/2345096.

जा.क्र.ब/कक्ष-13/मोजणी/766 /2023-24 सोलापूर ,413 004 दिनांक, 6 /07/2023.

विषय:- Proposal for diversion of forest land for proposed Greenfield Railway line between Solapur- Tuljapur- Osmanabad (Total Length of 84.439 Km) passing through Solapur and Osmanabad districts in the State of Maharashtra. (FP/MH/RAIL/155198/2022)

प्रति,

1. उपमुख्य अभियंता (C)-II,
मध्ये रेल्वे, भुसावळ, जि. जळगाव.
2. उपमुख्य अभियंता (Const),
मध्ये रेल्वे, सोलापूर

संदर्भ- 1. आपलेकडिल ऑनलाईन प्रणालीवरील प्रस्ताव क्र. (FP/MH/RAIL/155198/2022).
2. आपलेकडील पत्र क्र. SUR-UMD/New BG Line/Forest Pro./01, दि. 15/05/2023.
3. या कार्यालयाचे पत्र क्र. ब/कक्ष-13/मोजणी/395, दि. 30/05/2023.
4. आपलेकडिल पत्र क्र. SUR/UMD/New BG Line/Forest Pro/02, दि. 13/06/2023.
5. आपलेकडिल पत्र क्र. SUR/UMD/New BG Line/Forest Pro/03, दि. 23/06/2023.
6. या कार्यालयाचे पत्र क्र. ब/कक्ष-13/मोजणी/2409, दि. 16/12/2022.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी मौ. सोलापूर ता. उत्तर सोलापूर येथील राखीव वन ग. नं. 496 तसेच मौ. मार्डी ता. उत्तर सोलापूर येथील राखीव वन ग. नं. 165, 216 व 217 मधून सोलापूर-तुळजापूर- धाराशिव या रेल्वे मार्ग टाकणेसाठी आवश्यक 3.3685 हे. वनक्षेत्राचा वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गतचा प्रस्तावाचे आज दि. 06/07/2023 रोजी निम्नस्वाक्षरीकर्ते यांनी स्थळपाहणी केली असून त्यामध्ये खालीलप्रमाणे त्रुटी असल्याचे दिसून येत आहे.

1. आपणास या कार्यालयाचे वरील संदर्भ क्र. 6 अन्वये कळविल्यानुसार सदर रेल्वे मार्गामध्ये बाधीत होत असलेल्या पर्यावरण संवेदनशिल क्षेत्राबाबत आपलेकडून वन्यजीव (संरक्षण) अधिनियम 1972 अंतर्गत राज्य वन्यजीव मंडळ तसेच राष्ट्रीय वन्यजीव मंडळाची परवानगी घेतल्याचे दिसून येत नाही. तरी सदर बाबतचा विहीत नमुन्यातील प्रस्ताव वन्यजीव विभागास सादर करून पुढील उचित कार्यवाही करावी व तसे या कार्यालयास तात्काळ अवगत करावे.
2. मौ. मार्डी येथील राखीव वन गट नंबर 165 मधील वळतीकरण करावयाचे जागेवरील क्षेत्र व गाव नकाशावरील क्षेत्र यामध्ये तफावत असल्याचे दिसून आलेले आहे. तरी याबाबत खात्री करून पुनश्च सुधारित नकाशे अथवा जागेवरील क्षेत्र यामध्ये दुरूस्ती करावी व तसे या कार्यालयास तफावतीबाबत स्वयंस्पष्ट स्पष्टीकरणासह अवगत करावे.

तरी वरीलप्रमाणे त्रुटींची पुर्तता करून सुधारित प्रस्ताव 7 प्रतीत फेरसादर करावा जेणे करून सदरचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करणे सोईचे होईल.

(धैर्यशिल पाटील. भा. व. से.)
उपवनसंरक्षक,
सोलापूर वनविभाग, सोलापूर

प्रतिलीपी- 1. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांचेकडे वरीलप्रमाणे माहितीसाठी सविनय सादर.
2. मा.मुख्यवनसंरक्षक(प्रा),पुणे यांना वरीलप्रमाणे माहितीसाठी सविनय सादर.

प्रत:- 1. सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो),सोलापुर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.
2. वनपरिक्षेत्र अधिकारी, सोलापूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना.

2/- त्यांना कळविण्यांत येते की, वरील बाधीत होणा-या वनक्षेत्रातील वृक्षांची मोजदाद, प्रजातीनिहाय, वेढीनिहाय माहिती तसेच वृक्षतोडीचे अंदाजपत्रक व विहीत नमुन्यातील स्थळपाहणी अहवाल तसेच प्रस्तावीत ग. नं. चा वैधानिक दर्जा व त्यामध्ये कोणती न्यायालयीन प्रक्रिया चालू आहे अथवा कसे याबाबतची माहिती सादर करण्यांत यावी.

Scanned with CamScanner